ISSN - 2347-7075
Impact Factor - 8.141

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH




Vol. 6 No. 36
March - April 2025

Young Researcher Association

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

**ISSN–2347-7075** **Impact Factor–8.141**

## March - April 2025

## Volume-6 Issue- 36

**Published by:**
Young Researcher Association, Kolhapur, Maharashtra, India

***Website:*** *https://ijaar.co.in*
**Submit Your Research Paper on Email**
**Regular Issue:** editor@ijaar.co.in
For Publication Call On - **8624946865**

# Editorial & Advisory Board

## Chief Editor

**Dr. P. R. Talekar**
*Secretary,*
*Young Researcher Association, Kolhapur (M.S.), India*

## Executive Editor

**Dr. Rajendra Bhosale**
I/C Principal
Arts and Commerce College, Pusegaon

**Dr. Sanjay Kshirsagar**
*Assistant Professor and Librarian*
Arts and Commerce College, Pusegaon

## Editorial Board

**Dr. N. D. Lokhande**
*Assistant Professor, Dept. of English*
Arts and Commerce College, Pusegaon

**Mr. K. G. Kumbhar**
*Assistant Professor, Dept. of History*
Arts and Commerce College, Pusegaon

**Mr. P. V. Gaikwad**
*Assistant Professor, Dept. of Commerce*
Arts and Commerce College, Pusegaon

**Mr. L. K. Pawar**
*Assistant Professor, Dept. of Economics*
Arts and Commerce College, Pusegaon

**Shreemati M. B. Sonar**
*Assistant Professor, Dept. of Geography*
Arts and Commerce College, Pusegaon

**Mr. H. G. Nimase**
*Assistant Professor, Dept. of Marathi*
Arts and Commerce College, Pusegaon

## Advisory Board

**Dr. A. S. Jagtap**
**Dr. K. M. Nimbalkar**
**Mr. M. S. Wagh**
**Prof. Dr. S.R. Shinde**
**Mr. S. R. Dhongade**
**Mr. Kishor Shinde**
**Mr. A. T. Khade**
**Mr. G. A. Jadhav**
**Mr. M. N. Awale**

***The Editors shall not be responsible for originality and though text pressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and though text pressed in their papers.***

**© All rights reserved with the Editors**

| Sr. No. | Name of Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| **59** | कामिनी जनार्दन मोहिते<br>प्रा. डॉ. रशीद तहसिलदार | नासिरा शर्मा के उपन्यासों में चित्रित 'जीवन मूल्य' | 289 - 291 |
| **60** | डॉ. सविता लालासो नाईक निंबाळकर | भवानी प्रसाद मिश्र के काव्य में नए जीवन दर्शन की खोज | 292 - 295 |
| **61** | लिना महादेव कदम<br>डॉ. आर. पी. भोसले | मैत्रेयी पुष्पा के 'विज़न' उपन्यास में नारी परिवर्तित जीवन मूल्य | 296 - 300 |
| **62** | अविनाश दिलीप कांबळे | हिंदी महिला लेखिकाओं की कहानियों में चित्रित पारिवारिक मूल्य | 301 - 304 |
| **63** | डॉ. कुंदा मुकुंदराव निंबाळकर | देवेश ठाकुर के भ्रमभंग उपन्यास में चित्रित जीवन मूल्य | 305 - 308 |
| **64** | प्रा. देशमुख के. ए. | दूधनाथ सिंह के आखिरी कलाम में चित्रित जीवन मूल्य | 309 - 312 |
| **65** | डॉ. गणेश मनोहर लिंबोळे | भारतीय संविधानिक मूल्य आणि साहित्य | 313 - 316 |
| **66** | डॉ. रंजना मधुकर कदम | स्त्रीवादी साहित्यातील जीवनमूल्य | 317 - 326 |
| **67** | डॉ. शीतल शिवाजीराव धुमाळ | मराठी ग्रामीण साहित्य आणि स्त्रीवाद | 327 - 329 |
| **68** | प्रा. संतोष बापूराव ढोले | भारतातील दारिद्र्याचा चिकित्सक अभ्यास | 330 - 336 |
| **69** | श्री. भंडलकर ज्ञानेश्वर बबन | रामोशी समाजाचे साहित्यातील जीवनमूल्ये | 337 - 339 |
| **70** | शिल्पा चंद्रकांत पाटील | स्त्रीवादी साहित्यातील जीवनमूल्ये | 340 - 342 |
| **71** | महेश म. लोहार | संवैधानिक मूलभूत अधिकार आणि सामाजिक न्याय | 343 - 348 |
| **72** | सुप्रिया संतोष वाजे | भारतीय समाजावर विविध ऐतिहासिकक्रांतीचा झालेला परिणाम | 349 - 356 |
| **73** | प्रा. डॉ. महेंद्र केरबा गजधाने | सोलापूर जिल्ह्यातील कृषी उत्पादन घटकातील बदल | 357 - 360 |
| **74** | अशोक नवनाथ शेकडे | ग्रंथालयाचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम | 361 - 367 |
| **75** | श्री. शिंगाडे ज्ञानेश्वर ईश्वर<br>श्रीम. कोळपे किशोरी भागुजी | ग्रंथालय क्षेत्रातील संशोधन आणि संशोधनाचे प्रकार | 368 - 375 |
| **76** | श्री. भंडलकर ज्ञानेश्वर बबन<br>डॉ. अशोक नामदेव शिंदे | उमाजी नाईकांचे मराठी साहित्यातील चित्रित केलेले गुणवैशिष्ट्ये | 376 - 381 |
| **77** | जाधव सतीश रजनीकांत | सामाजिक मानसिकतेवर आणि गुन्हेगारीवर सोशल मीडियाचा होणारा परिणाम | 382 - 388 |
| **78** | डॉ. प्रकाश टोणे<br>श्री. निलेशकुमार गुरव | भारतातील दारिद्र्याच्या स्थितीचा चिकित्सक अभ्यास | 389 - 397 |
| **79** | प्रा. सुनिल कल्याण विधाते | यशवंतराव चव्हाणांचे शिक्षण धोरण (१९६० चे दशक): तत्कालीन राजकीय वातावरण आणि प्रतिसाद | 398 - 404 |
| **80** | डॉ. निलेश भाऊसो वळकुंजे | गोवामुक्ती संग्रामाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | 405 - 410 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 36 March - April - 2025

# गोवामुक्ती संग्रामाचा मराठी साहित्यावरील प्रभाव

**डॉ. निलेश भाऊसो वळकुंजे**
*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,*
*राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.*
*Corresponding Author – डॉ. निलेश भाऊसो वळकुंजे*
DOI - 10.5281/zenodo.16739932

**प्रस्तावना:**

गोवा आणि मराठी साहित्य परंपरा याचे प्राचीन कालखंडापासून संबंध आहेत. प्राचीन कालखंडापासून ते आजपर्यंत गोव्यातील साहित्य परंपरेत मराठीचे साहित्य परंपरेचे स्थान सर्वोच्च स्थानी आहे. या साहित्य परंपरेला पोर्तुगीजांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक धोरणामुळे अवकळा प्राप्त झाली होती. मात्र इ. स. १९३० पासून पुन्हा एकदा मराठी साहित्य परंपरेला गोव्यात सर्वोच्च स्थान प्राप्त झाले. इ. स. १९३० साली मडगाव येथे अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे १५ वे वार्षिक अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनास तत्कालीन कालखंडातील दिग्गज मराठी मंडळी उपस्थित होते. यामध्ये लक्ष्मणराव सरदेसाई, दा. अ. कारे, स. ब. कंटक, बा. द. सातोस्कर आणि बा. भ. बोरकर यांचा समावेश होता. हे अधिवेशन गोमंतक आणि मराठी साहित्यपरंपरा यांना जोडणारा दुवा ठरले. या अधिवेशनानंतर मराठी साहित्यात मोठ्याप्रमाणात गोमंतक संस्कृतीचे आणि तेथील राजकीय लढ्याचे वर्णन येऊ लागले. इ. स. १९३० च्या अगोदर हे नव्हते काय? तर ते होते. मात्र पोर्तुगीजांच्या अनेक बंधनाच्यामुळे गोव्यातील मराठी साहित्य परंपरेला मर्यादा प्राप्त झाली होती. ही मर्यादा इ. स. १९३० च्या मराठी साहित्य संमेलनाच्या १५ व्या वार्षिक अधिवेशनामुळे संपुष्टात आली आणि गोमंतक संस्कृतीचे व तेथील राजकीय चळवळीचे वर्णन मराठी साहित्य परंपरेत मोठ्या प्रमाणात होऊ लागले. ज्या पद्धतीने ब्रिटीशांच्या विरोधातील स्वातंत्र्यलढा व संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे प्रतिबिंब मराठी साहित्यात दिसून येते. त्याच पद्धतीचे दृश्यमान आपल्याला गोव्याच्या मुक्ती चळवळीच्या बाबतीत ही मराठी साहित्यामधून दिसून येते.

**गोवामुक्ती संग्रामाचा मराठी साहित्यावरील प्रभाव:**

गोवामुक्ती चळवळीला मराठी साहित्याच्या माध्यमातून लोकांसमोर आणण्याचा पहिला प्रयत्न स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी केला होता. इ. स. १९२२ साली त्यांनी ‘गोमंतक’ नावाच्या महाकाव्याची निर्मिती केली. हे महाकाव्य इ. स. १९२४ साली प्रकाशित झाले आणि या महाकाव्याने गोव्यातील पोर्तुगीज सत्तेला हादरा दिला. या काव्याच्या माध्यमातून सावरकरानी गोव्यातील शुद्धी आंदोलने, शुद्धिसमारंभ, पोर्तुगीज राजसत्तेचा गोव्यातील जुलमी कारभार यावर प्रकाश टाकला होता.[१] याबरोबरीने या काव्यातून सावरकरांनी पोर्तुगीजकालीन गोव्यातील असणाऱ्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचे वर्णन केले आहे.[२]

सावरकरांच्यानंतर गोवामुक्ती संग्रामाचे वर्णन कवी बा. भ. बोरकर यांनी त्यांच्या साहित्यिक कृतीच्या माध्यमातून केले आहे. इ. स. १९४० नंतर गोव्यात घडणाऱ्या अनेक सामाजिक व राजकीय घटनांच्या कालखंडात बोरकर यांचे व्यक्तिमत्त्व घडले होते. इ. स. १९४६ पासून सुरू झालेल्या गोवामुक्ती संग्रामात बा. भ. बोरकरांनी सहभाग घेतला होता.[३] त्यामुळे गोवामुक्ती संग्रामाचा जवळून परिचय बोरकर यांना होता. गोवामुक्ती संग्रामाचा हाच परिचय आपल्या साहित्यामध्ये उतरविण्याचे कार्य बोरकर यांनी केले होते. त्यांनी स्वातंत्र्याची सिंहगर्जना, शांतादुर्गा, दुराताम्याची जागृती, सोळा वर्षानंतर इ. कवितांच्या माध्यमातून गोवामुक्ती संग्रामाचे वर्णन केले आहे. भगवती स्वतंत्रेय, हसता लावा वज्रटिळा, साबरमतीच्या काठी, आमर बानी, माझी पूजा, कानफाट्याचा फटका, चिरंतनाचा ध्यास, त्रिवार मंगलवार या त्यांच्या कविता मुक्ती संग्रामाची स्फूर्ती गीते होती.[४]

कवी बोरकर यांच्या वरील उल्लेखित कवितांपैकी त्रिवार मंगलवार ही कविता मुक्ती संग्रामात सर्वोच्च स्थानी होती. गोवा मुक्ती संग्रामाची सुरुवात दिनांक १८ जून रोजी झाली होती. या दिवशी मंगळवार होता. हा दिवस समोर ठेवून त्यांनी 'त्रिवार मंगलवार' या काव्याची निर्मिती केली होती. यामध्ये लोहिया यांचा गौरव करताना ते म्हणतात की,

**त्रिवार मंगलवार आजला। त्रिवार मंगलवार।**
**स्वातंत्र्याची सिंहगर्जना आता इथे उठणार ॥धृ॥**
**धन्य लोहिया, धन्य भूमि ही, धन्य तिचे पुत्र।**
**धन्य तयाचा त्याग देखते शिणले नेत्र ॥**[५]

त्रिवार मंगलवार प्रमाणेच बोरकर यांनी 'तिरंगी झेंड्यास गोव्याचे निमंत्रण' या काव्यातून पोर्तुगीज सत्तेने गोव्याला कशाप्रकारे गुलाम बनविले आहे याचे यथार्थ वर्णन केले आहे. त्यांची ही कविता वैनतेय या वृत्तपत्राने दिनांक १४ जून १९४९ च्या अंकात प्रकाशित केली होती.[६] तसेच कवी बोरकर यांनी दिनांक २३ जून १९४६ रोजी लोहिया यांच्या सत्कारासाठी बेळगाव येथील मार्केट मधील झेंडा चौकात आयोजित करण्यात आलेल्या सभेत त्यांनी रचलेली 'स्वातंत्र्याची सिंहगर्जना' व एक पोवाडा म्हणून दाखविला होता.[७]

बोरकरांच्या बरोबरीनेच वि. स. सुखटणकर यांनीही त्यांच्या साहित्यात गोवामुक्ती संग्रामाचे यथार्थ वर्णन केले आहे. 'इतिकर्तव्य' आणि 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' या दोन कथा संग्रहाच्या माध्यमातून त्यांनी पोर्तुगीजकालीन गोव्यातील असणाऱ्या अनेक प्रश्नांची मांडणी केली आहे. याच बरोबरीने त्यांनी गोव्यातील विविध जाती, व्यक्ती चरित्र, भाटकार आणि त्यांची कुळे, हिंदू परस्पर संबंध, देवदासी प्रथा, पोर्तुगीज अधिकाऱ्यांचे जुलमी धोरण इ. घटकांच्यावर ही त्यांनी त्यांच्या लेखनाच्या माध्यमातून प्रकाश टाकला आहे.[८] सुखटणकरांच्या बरोबरीने पं. महादेवशास्त्री जोशी यांनीही आपल्या साहित्यातून गोव्याच्या मुक्ती चळवळीला शब्दबद्ध केले आहे. पं. जोशी हे गोवा मुक्ती चळवळीच्या कार्यात अग्रभागी असल्याने त्यांचा साहित्यातून गोवामुक्ती संग्रामाचे यथार्थ दर्शन आपल्याला होते. 'आफ्रिकेचे जहाज' या कथेतून त्यांनी आग्वाद येथील निग्रो सैनिकांचा परिचय करून दिला आहे, तर निवारा या कथेतून त्यांनी पोर्तुगीज राजवटीतील पोर्तुगीज पुरुष व गोमंतक स्त्रियांच्या संबंधावर प्रकाश टाकला आहे.[९] 'आत्मपुराण' या कथेत त्यांनी सत्तरीतील दीपाजी राणे यांच्या बंडाचे वर्णन केले आहे.[१०] शास्त्री यांच्या प्रमाणेच लेखक द. व्य. पै यांनी त्यांच्या 'जळता गोमंतक' या पुस्तकातून पोर्तुगीज कालखंडात गोव्यात असणाऱ्या परिस्थितीचे वर्णन केले आहे. पै यांच्या या पुस्तकाचा प्रचार केसरी वृत्तपत्राने आपल्या अंकातून केला होता. प्रचाराच्या बरोबरीनेच या पुस्तकाच्या आगाऊ नोंदणीसाठी जनतेला आवाहन करण्याचे कार्य केसरीने केले होते.[११]

वरील उल्लेख केलेल्या साहित्यांच्या बरोबरीनेच प्रत्यक्ष चळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक साहित्यांची निर्मिती तत्कालीन कालखंडात करण्यात आली होती. या साहित्याची रचना प्रत्यक्ष गोवा मुक्तीची चळवळ समोर ठेवून करण्यात आली होती. दिनांक १५ ऑगस्ट १९५४ रोजी गोवा काँग्रेसच्या वतीने सत्याग्रह चळवळीचे आयोजन करण्यात आले होते. या चळवळीतील सहभागी सत्याग्रही लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी गजानन रायकर यांनी पाच चरण असलेली 'रोवू चला पणजीवर तिरंगी झेंडे' या कवितेची रचना केली होती. स्वत: रायकर यांनी गोव्याच्या सत्याग्रह चळवळीत सहभाग घेतला होता. सत्याग्रह चळवळीतील सहभागामुळे त्यांना कारावास भोगावा लागला होता. या सर्व अनुभवांचे वर्णन त्यांनी या कवितेच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या कवितेने तत्कालीन कालखंडात संपूर्ण गोवा मुक्ती चळवळीला प्रोस्ताहित केले होते. या कवितेतील काही काव्यपंक्ती पुढील प्रमाणे होत्या.

**व्हा, पुढे चलापुढे, रोवू चला पणजीवर विजयी झेंडे ॥ धृ ॥**
**रक्ताचे करुनिया दान । चढवू कीर्तिचे निशाण ।**
**उधळती देव वरुनी सुभांडे सडे । रोवू चला पणजीवर विजयी झेंडे ॥ १ ॥**[१२]

गजानन रायकरांच्या प्रमाणेच साहित्यिक मंगेश कर्णिक यांनी 'पंधरा ऑगस्ट एकोणिशे पंचावन्न' या नावाची व सत्तावीस चरणे असलेल्या एका दीर्घ कवितेची रचना केली होती. या कवितेची रचना दिनांक १५ ऑगस्ट १९५५ ची सत्याग्रह चळवळ समोर ठेवून केली होती. या कवितेच्या माध्यमातून कर्णिक यांनी गोव्यातील पोर्तुगीजांच्या राजसत्तेच्या कालखंडातील गोव्यातील संपूर्ण राजकीय आणि सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकला होता. ही कविता वैनतेय वृत्तपत्राने आपल्या अंकात प्रकाशित केली होती.[१३] कर्णिकांच्या प्रमाणेच खासदार हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय यांनी दिनांक १५ ऑगस्ट १९५५ रोजी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या सामुदायिक सत्याग्रह प्रसंगी 'एका संग्राम गीतेचे' या काव्याची रचना केली. बारा चरणे असलेल्या या कवितेत पोर्तुगीज सरकारच्या राज्यकारभारावर प्रखरपणे प्रहार करण्यात आला होता. मूळ हिंदीमध्ये असलेल्या या कवितेचा मराठीमध्ये अनुवाद चंद्रशेखर म्हमाणे यांनी केला होता. चंद्रशेखर म्हमाणे यांनी अनुवादित केलेली कविता सोलापूर समाचार वृत्तपत्राने त्यांच्या अंकात प्रकाशित केली होती.[१४]

काव्य साहित्याच्या माध्यमातून गोवामुक्ती संग्रामाला प्रोत्साहन देण्याच्या बाबतीत प्रत्यक्ष सत्याग्रहात सहभागी असलेले सत्याग्रहीही मागे नव्हते. दिनांक ०२ जून १९५५ रोजी गोव्यात सत्याग्रह करण्यात आलेल्या तिसऱ्या तुकडीचे नेते कॉ. आत्माराम पाटील यांनीही एका कवितेची रचना केली होती. त्यांनी या कवितेतून गोव्यातील नैसर्गिक सजीव सृष्टीचे वर्णन केले होते. या कवितेत ते म्हणतात की,

**वसुंधरेचे आतिल सुंदर रूप न्यारे ।**
**इथे निधीने विश्वदर्शन निर्मिले न्यारे ।**
**कि हिंदी देवीच्या शिरी शालू काश्मिरी ।**
**त्यांचा भरजरी पदर तडपतो कोकणाचा ।**
**रम्य हा गोमंतक आपुला आज परदास्यपंती रुतला ॥**[१५]

निसर्ग सौंदर्याने भरलेल्या गोमंतक भूमीला पोर्तुगीजांनी गुलामगिरीच्या माध्यमातून कशा प्रकारे दूषित बनविले आहे याचे वर्णन या कवितेच्या माध्यमातून पाटील यांनी केले आहे. पाटील यांच्या प्रमाणेच शाहीर अमरशेख यांनी ही गोमंतकाचे वर्णन करणारी कविता केली होती. या कवितेत गोव्यातील सौंदर्याचे वर्णन करताना ते लिहितात की,

**दुःखाचे नंदनवन आमुचे ।**
**खाण दुजी सौंदर्याची ।**

**ताडमाड, दुधसागर शोभा निळ्या मनोहर दर्याची ।**
**आमुचे अंगण आम्हांस बंधन न्याय अजब दृष्टीस पडे ।**[१६]

या कवितेच्या माध्यमातून गोव्यातील पोर्तुगीज सत्तेच्या विरोधात पेटून उठण्याचा संदेश शाहीर शेख यांनी भारतीय जनतेला दिला होता. या सर्व काव्य रचनेत सेनापती बापट देखील मागे राहिले नव्हते. सेनापती बापट हे स्वत: या लढ्यात सहभागी झाले होते. ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या पहिल्या तुकडीत त्यांचा समावेश होता. या सत्याग्रहाच्या आठवणीला उजाळा देणारी 'पूर्ण सत्याग्रह' या नावाची पुस्तिका त्यांनी प्रसिद्ध केली होती. या पुस्तिकेत ते सुधा जोशी व सहोदरादेवी यांच्या कार्याचा गुणगान करताना लिहितात की:

**"सहोदेरा अद्भूत वीर्यशाली**
**सुधा उठावास सुधास झाली.**
**उठाव गोवागत थंड झाला.**
**सुधा-गुणे-प्राण तयास आला"**[१७]

या कवींच्या बरोबरीनेच मराठी शाहिरांनी देखील गोवा मुक्तीची चळवळ समोर ठेवून आपल्या शाहिरी कवनांची रचना केली होती. गोवा मुक्ती संग्रामाच्या कालखंडात महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरू होती. या भाषिक चळवळीत या शाहिरांनी समाज जागृतीचे कार्य अखंडपणे पेलले होते. तशाच प्रकारचे कार्य या शाहिरांनी गोवा मुक्तीसाठी केले होते. गोव्याचा मुक्ती लढा समोर ठेवून शाहीर अमरशेख यांनी 'गोव्याकडे' या शाहिरी कवनाची निर्मिती केली होती. या शाहिरी कवनात ते म्हणतात की,

**एक भारतीय जोंवर राहिल गुलामगिरीच्या बंधात**
**तोंवर कुठला घास सुखाचा कोण असे आनंदात?**
**फिरंगी साम्राज्याचे मिळवूं धुळीत उरले कोट खडे**
**वेचुनि काढा; मत्त पोर्तुगिझ मुळासकट, अन चला पुढे**
**व्हारे पुढे अन चला पुढे ॥ १ ॥**[१८]

शाहीर अमर शेख यांच्या प्रमाणेच अनामिक या टोपण नावाने लिहिणाऱ्या शाहिराने 'गोवा प्रांत जागृत झाला' हे शीर्षक असलेल्या पोवाड्याची रचना केली होती. एकूण आठ चरणात असलेल्या या पोवाड्यातून गोवामुक्ती संग्रामाच्या प्रारंभापासून ते पहिला हुतात्मा बाळा मापारी यांच्या हौतात्मापर्यंत गोवामुक्ती चळवळीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. यामध्ये तो एका ठिकाणी म्हणतो की,

**शाम मनोहर आला । नेता वाटला**
**एकल्या जनतेला करि वंदिवान सरकार । जी जीजी ॥ १ ॥**
**मोठा प्रसंग आला । याचा विचार पाहिजे केला ।**
**नातरि कोणी लेखिले तुम्हांला । नामान जगी गुलामाला ।**
**चला मुक्त करा राष्ट्राला ।आपल्या मातृभूमीला ।**
**धरुनी लाजेला । जी जी जी ॥ २ ॥**[१९]

या शाहिरी पोवाड्याच्या माध्यमातून शाहिराने गोव्यातील सामाजिक, राजकीय आणि पोर्तुगीज शासनाच्या अमानवीय धोरणावर टीका केली आहे.

या वरील शाहिरांच्या बरोबरीनेच शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर द. ना. गवान यांनीही शाहिरी पोवाड्याची रचना केली होती. शाहिरी पोवाड्यांच्या निर्मिती बरोबरीनेच गोवामुक्ती संग्रामाच्या बाबतीत लोकांच्यामध्ये जागृती व्हावी यासाठी 'लाल बावटा' कला पथकाच्या माध्यमातून शाहीर शेख, साठे व गवान यांनी कार्य केले होते.[२०] लोकजागृती बरोबरच गोवामुक्ती संग्रामासाठी मुंबईमधून निधी जमविण्याचे कार्यही या संघटनेने केले होते.[२१] हा निधी जमविण्यासाठी काढण्यात येणाऱ्या प्रभात फेऱ्यांच्यामध्ये अग्रभागी राहून शाहीर अमर शेख आपल्या पहाडी आवाजात त्यांनी रचलेला 'वेचून काढा मळ पोर्तुगीज मुळासकट अन चला पुढे । व्हापुढे चला पुढे' हा पोवाडा आपल्या पहाडी आवाजात गात असत.[२२]

गोव्याच्या मुक्ती चळवळीसाठी रचना करण्यात आलेल्या शाहिरी पोवाड्यांची माहिती लोकांना कळावी यासाठी 'अमरशेख प्रस्तुत शाहिरी' या पुस्तकाचे प्रकाशन गोवा विमोचन समिती, मुंबई शाखा यांच्या वतीने करण्यात आले होते. या प्रकाशनाची किमंत ४ आणे इतकी होती. या प्रकाशनाच्या माध्यमातून मिळालेल्या रक्कमेचा वापर सत्याग्रह चळवळीसाठी करण्यात आला होता.[२३] शाहिरांच्या बरोबरीनेच मराठी कलाकारांनीही गोवामुक्ती लढ्यासाठी आपले योगदान दिले होते. गोवा मुक्तीसाठी निधी संकलित करण्यासाठी बेळगाव येथे मराठी कलाकारांनी प्रभात फेरी काढली होती. या प्रभात फेरीत हंसा वाडकर, जयश्री, शालिनी, शांताजोग, विवेक धुमाळ, राजन, नागेश जोशी इ. सिनेतारकांचा समावेश होता. त्यांनी या फेरीच्या माध्यमातून ५४० रुपये इतकी रक्कम जमविली होती. ही जमविलेली रक्कम सिनेनट धुमाळ यांनी त्याच रात्री रिझ थियटर मध्ये 'लग्नाची बेडी' या नाट्य प्रयोगाच्यावेळी डॉ. गायतोंडे यांच्याकडे सुपूर्द केली होती.[२४]

## समारोप:

मराठी साहित्य परंपरेत अनेक महत्त्वाच्या चळवळीचे प्रतिबिंब आपल्याला दिसून येते. या चळवळींचे संपूर्ण चित्रण सामान्य लोकांच्या समोर ठेवण्याचे काम मराठी साहित्याच्या माध्यमातून झाले आहे. मराठी साहित्याची ही परंपरा आपल्याला गोवामुक्ती संग्रामाच्या बाबतीत दिसून येते. गोवामुक्ती संग्रामाच्या समकालीन कालखंडात मराठी भाषिक लोकांचे एकत्रीकरण हा उद्देश समोर ठेऊन 'संयुक्त महाराष्ट्र' या नावाची भाषिक चळवळ महाराष्ट्रात सुरू होती. त्यामुळे तत्कालीन कालखंडात भाषा या घटकाचा खूप मोठा प्रभाग महाराष्ट्रातील मराठी लोकांच्यावर होता. गोमंतक लोकांची बोलीभाषा ही कोकणी होती. कोकणी भाषा ही मराठी भाषेची उपभाषा आहे. त्यामुळे जेंव्हा गोवा पोर्तुगीजांच्या तावडीतून मुक्ती होईल तेंव्हा गोव्याचा समाविष्ट हा संयुक्त महाराष्ट्रात करण्यात यावा, या उद्देशाने मराठी लोकांनी गोवामुक्ती संग्रामात अग्रस्थानी सहभाग नोंदविला होता. त्यामुळे मराठी साहित्यामध्ये ज्या प्रकारे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे दृश्यमान आपल्याला बघायला मिळते; तशाच प्रकारचे दृश्यमान आपल्याला गोवामुक्ती संग्रामाचे मराठी साहित्यामध्ये दिसते.

मुळात गोमंतक लोकांची बोलीभाषा जरी कोकणी असली तरी त्यांची साहित्यिक भाषा ही मराठी होती. गोव्यात प्राचीन कालखंडापासून सर्व साहित्यांची निर्मिती ही मराठी भाषेतून होत होती. परंतु पोर्तुगीजांच्या धार्मिक धोरणामुळे या मराठी साहित्यपरंपरेवर गोव्यात मर्यादा निर्माण झाल्या होत्या. मराठी साहित्य निर्मितीवरील ही मर्यादा आपल्याला मुक्ती संग्रामाच्या कालखंडात गोमंतक लोकांनी उखडून टाकली होती. मुक्ती संग्रामाचे स्वरूप, प्रत्यक्ष मुक्ती संग्रामाची माहिती ही लोकांना समजावी यासाठी मराठी भाषेत मोठ्याप्रमाणत साहित्याची निर्मिती झाली. तसेच प्रत्यक्ष मुक्ती संग्रामात सहभागी असणाऱ्या लोकांनी मराठीमध्ये अनेक कवितांची, कथांची निर्मिती केली होती. परिणामी संयुक्त महाराष्ट्र चळवळीप्रमाणेच गोवामुक्ती संग्रामाचे ही प्रतिबिंब आपल्याला मराठी साहित्य परंपरेत पाहायला मिळते.

## संदर्भ:

१. सावरकर वि. दा., महाकाव्य गोमंतक, अजब प्रकाशन, कोल्हापूर, पूर्वमुद्रण-२०१३, पृ. ०५
२. कित्ता, पृ. ०६
३. गाणोरकर प्रभा, भारतीय साहित्याचे निर्माते बा. भ. बोरकर, साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, द्वितीय आवृत्ती, २००४, पृ. ३१
४. कित्ता, पृ. ३३

५. सातोस्कर, बा. द., गोमंतक प्रकृती आणि संस्कृती, खंड ३, शुभदा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८७, पृ. २८१

६. साप्ताहिक वैनतेय, दिनांक १४ जून १९४९, पृ. ०५

७. दै. तरुण भारत बेळगाव, दिनांक ०१ ऑक्टोंबर १९४६

८. केळकर वृंदा, गोमंतकीय कथा-कांदबरी लेखनातील एक व्यक्तिरेषा एक विमोचन, अप्रकाशित शोधप्रबंध, गोवा विद्यापीठ, पणजी, २०१०, पृ. ०२

९. कोमरपंत सोमनाथ (संपा), गोमंतक मराठी साहित्य संमेलन भाषणे, पणजी, १९९२, पृ. ४८१

१०. देशपांडे अ. ना., आधुनिक मराठी वाङ्:मयाचा इतिहास, खंड २, पुणे, १९५८, पृ. ४८१

११. दै. केसरी, दिनांक २७ जुलै १९४८, पृ. ०४

१२. दै. तरुण भारत बेळगाव, दिनांक १७ ऑगस्ट १९५४, पृ. ०१

१३. साप्ताहिक वैनतेय, दिनांक ३० ऑगस्ट १९५५, पृ. ०३

१४. दै. सोलापूर समाचार, दिनांक १५ ऑगस्ट १९५५, पृ. ०३

१५. दै. केसरी, दिनांक ०२ ऑक्टोंबर १९५५, पृ. ०४

१६. दै. नवाकाळ, दिनांक ०३ ऑक्टोंबर १९५५, पृ. ०५

१७. मासिक स्त्री, दिनांक १४ जानेवारी १९५६, पृ. ०४

१८. शेख मालिका अमर, निवडक शाहीर अमरशेख, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१७, पृ. ३९५

१९. दै. तरुण भारत बेळगाव, दिनांक ०१ ऑक्टोंबर १९४६, पृ. ०३

२०. मेणसे आनंद, गोवामुक्ती संग्रामातील कम्युनिस्टांचे योगदान, कॉ. गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २०११, पृ. ६५

२१. दै. तरुण भारत बेळगाव, दिनांक २४ जून १९४७, पृ. ०६

२२. साप्ताहिक वैनतेय, दिनांक १४ ऑगस्ट १९५४, पृ. ०२

२३. दै. केसरी, दिनांक ०२ ऑक्टोंबर १९५५, पृ. ०४

२४. दै. तरुण भारत बेळगाव, दिनांक १२ जुलै १९५५, पृ. ०५